# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२१ दि. २५ मार्च,२०२१

( कृपया, आपल्या दैनिकाच्या जळगाव,धुळे व नंदूरबार आवृत्तीमध्ये बातमी प्रसिध्द करावी, ही विनंती.)

**जळगाव दि.२५ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाची अधिसभेची ऑनलाईन सभा प्रभारी कुलगुरू प्रा.ई.वायुनंदन यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवार, दि.२५ मार्च रोजी सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आली. डॉ. शामकांत भादलीकर यांनी प्रभारी कुलसचिव तथा सचिव अधिसभा म्हणून कामकाज पाहिले.**

सभेची सुरुवात राष्ट्रगीताने होऊन शोकसंदेशांवर चर्चा करून सभेचे कामकाज सुरु असतांना अधिसभेतील काही मोजक्या सभासदांनी अधिसभेचे कामकाज ऑनलाईन ऐवजी ऑफलाईन घेण्यात यावे असा आग्रह धरला.

प्रभारी कुलगुरु प्रा.ई.वायुनंदन यांच्या कुटुंबातील सदस्य कोरोना बाधित झाल्याने त्यांना सभेत उपस्थित होण्यास दहा ते पंधरा मिनिटे उशिर झाला. त्या बद्दल त्यांनी दिलगिरी व्यक्त करुन कोरोनाचा प्रादुर्भाव लक्षात घेता जिल्हा अधिकारी यांच्या आदेशानुसार अधिसभेचे कामकाज ऑनलाईन घेण्यात येत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

मात्र अधिसभेतील मोजक्या सदस्यांनी अधिसभेचे कामकाज ऑफलाईन घेण्याचा आग्रह केला. त्यांचा आग्रह विचारात घेऊन अधिसभेचे कामकाज कुलगुरुंनी तुर्त स्थगित केले. विद्यापीठाने ऑफलाईन अधिसभा दि.३० मार्च रोजी आयोजित करण्याबाबत जिल्हा अधिकारी यांच्याकडे विनंती अर्ज दिला असून त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे विद्यापीठातर्फे प्रभारी कुलसचिव डॉ.शामकांत भादलीकर यांनी कळविले आहे.

------------------------------------:::::::::::::::::::::::-------------------------------------

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय देनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

प्रमोद आ.चव्हाण

जनसंपर्क अधिकारी यांच्या करिता